# बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

On the web
www.bmmonline.org

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र
समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

नोव्हेंबर, २०११
वर्ष ३१, अंक ११

## अध्यक्षीय

मंडळी नमस्कार. लाडू, करंज्या, चकली, चिवडा यांचे बोकाणे भरतच मी तुमच्याशी संवाद साधतोय. एरवी Coke मध्ये Sugar आणि Calories भरपूर म्हणून Diet Coke ला जवळ करणारा मी, दिवाळीचा फराळ म्हटला की हात आणि जीभ थोडी सैल सोडूनच त्याच्यावर ताव मारतो. कदाचित भारतीय पदार्थांवर Sugar आणि Fat चे Label नसल्यामुळे किंवा आपल्या पारंपरिक सवयींमुळे असेल पण आपले मराठमोळे पदार्थ दिसले की Diet, Calorie Consciousness को मारो गोली.

यंदाच्या दिवाळीत मी ५ मंडळांना भेटी दिल्या. उद्देश हाच की मंडळांच्या Biggest Celebration मध्ये सभासदांबरोबर सहभागी व्हावं. त्यांना BMM च्या कामकाजाची माहिती द्यावी आणि त्याचबरोबर तिथल्या कलाकृती, पाककला आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन द्यावं.

प्रत्येक ठिकाणची सजावट, कलाविष्कार, सभासदांचे ठेवणीतले कपडे, दागदागिने पाहिल्यावर शिरीष कणेकरांचं एक वाक्य आठवलं. ते म्हणायचे, “अहो थोरामोठ्यांची, टाटा–बिर्लाची (अमेरिकेतल्या भाषेत मराठी मंडळांची) दिवाळी वेगळी आणि आपली दिवाळी वेगळी.” आपली दिवाळी (माझी) म्हणजे काय, इकडे बघायचं, तिकडे बघायचं आणि कोणी बघत नसेल तर शेजारच्याच्या पणतीतलं तेल आपल्या पणतीत ओतायचं. विनोद बाजूला ठेवला तरी या पाचही ठिकाणच्या दिवाळी महोत्सवांना स्वतःचं अस्तित्व होतं, भपका होता, नावीन्य होतं. आणि त्याचबरोबर एक्मेकांबरोबर सण साजरा करण्याची जवळीक होती, ओलावा होता. Baltimore येथे नवीनच स्थापन झालेल्या मंडळात १४ ऑक्टोबरला दिवाळी साजरी झाली. तिथल्या मंडळाने स्थानिक कलाकारांचे कार्यक्रम करताना Mainstream American मुलांनाही नाचात सहभागी केलं होतं. दिलीप परिख यांच्या कुशल दिग्दर्शनाने सादर केलेले नाटक तुफान रंगले. २२ ऑक्टोबरला मराठी विश्व, न्यू जर्सी यांच्या कार्यक्रमात सहभागी झालो. मराठी विश्व बद्दल मला नितांत आदर आहे. माझ्या माहितीप्रमाणे ते अमेरिकेतलं एकमेव मंडळ आहे ज्यांची स्वतःची वास्तू आहे.

२३ तारखेला Washington च्या मराठी कला मंडळाच्या कार्यक्रमाला गेलो असताना क्षणभर मी BMM Convention ला आलोय की काय असं वाटलं. सभासदांचा फेसाळणारा उत्साह, थिरकायला लावणारा गाण्यांचा कार्यक्रम, अद्ययावत सभागृह, एखाद्या Banquet Hall ला लाजवेल असा सुशोभित केलेला Dining Hall, उत्तम नियोजन. Kudos to Amol Phulambarkar & his team.

२९ तारखेला आमच्याच Delaware मंडळातली दिवाळी गाजवली ‘सप्तसूर’ या कार्यक्रमाने. माझ्या मते ते सप्तसूर नसून तप्तसूर होते. ५ नोव्हेंबरला Boston च्या दिवाळीच्या कार्यक्रमात भाग घेतला. प्रथम Convention Center ची tour घेतली. सर्व सुखसोयी असलेलं, conveniently placed Convention Center २०१३ च्या अधिवेशनासाठी तुम्हाला नक्कीच आवडेल. संध्याकाळी ‘गुंजन’ या अंकाचं प्रकाशन केलं, त्यानंतर शशांक आणि मधू नेने यांचं ‘घोळात घोळ’ हे नाटक पाहिलं आणि Boston area मधल्या कलाकारांच्या परिपक्वतेची कल्पना आली.

सर्व मंडाळांचं उत्तम नियोजनाबद्दल अभिनंदन आणि मला आग्रहाच्या निमंत्रणाबद्दल आभार. तुमच्या मंडळात दिवाळी कशी साजरी केली हे आम्हाला जरूर कळवा. वृत्तात किंवा BMM Website वर नक्की प्रसिद्ध करू.

हा अंक हातात पडेपर्यंत Thanksgiving येईल (Canada मध्ये गेल्या महिन्यात झाले). Thanksgiving हा सण युरोपियन आणि Native American लोक चांगल्या harvest साठी देवाला धन्यवाद देण्यासाठी साजरा करत आले. त्याचप्रमाणे मी आणि माझी कार्यकारिणी तुम्ही आम्हावर जो विश्वास दाखवलात तोच द्विगुणीत होवो याबद्दल आभार व्यक्त करतो.

कळावे, लोभ असावा.

आपला

**आशिष चौघुले**

**अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ**

achaughule@gmail.com

### या अंकात ...

श्रद्धांजली: डॉ. लक्ष्मण (बंडू) फडके ... २

बीनटाऊनच्या बातम्या: घोषवाक्य आणि प्रतिकचिन्ह स्पर्धा ... ३

गणपती... एक असाही! – प्राजक्ता पटवर्धन ... ४

ड्रॅगनच्या देशात – रमेशचंद्र (दादा) प्रधान ... ६

जावे त्यांच्या गावा – कॉलोराडो ... ८

मनोरंजन, माहिती आणि संगीताचा खजिना: iMusti.com – स्नेहल वझे ... १०

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)

**संस्थापक**
कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
**संपादक:** संजय गोखले, न्यू यॉर्क

**सहसंपादक:** वैभव पुराणिक, लॉस एंजेलिस,
राजश्री कुलकर्णी, न्यू जर्सी

**संपादन-सल्लागार:** मोहन रानडे
**कार्यकारिणी संपर्क:** वसुधा पटवर्धन
**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय**
Mohan Ranade, 144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-215-354-1423 (EST), E-mail: brihanmm@gmail.com
**वर्गणीचे दर**

**Electronic copy: $12 / year**     **Printed Copy: $25 / year**
Subscription payment is accepted online by PayPal at
http://www.bmmonline.org/vruttasubscription

**जाहिरातीचे दर**

| | | | |
|---|---|---|---|
| **पूर्ण पान:** | **$160** | **अर्धे पान:** | **$ 90** |
| **पाव पान:** | **$ 55** | **अष्टमांश पान:** | **$ 40** |

- वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत हाती आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर त्या नजीकच्या वृत्तात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.
– प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही.
– लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलांचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील.
– पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.



**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०११–२०१३)**

**मताधिकार असलेले सभासद**

| | |
|---|---|
| **अध्यक्ष:** | आशिष चौघुले, होकेस्सीन, डेलावेअर |
| **कार्यवाह:** | नमिता दांडेकर, टोरॉन्टो, कॅनडा |
| **कोषाध्यक्ष:** | अजय दांडेकर, लॉस एंजेलिस, कॅलिफोर्निया |
| **सदस्य:** | राहुल कर्णिक, डॅलस, टेक्सास |
| | सुचिता कुलकर्णी–लांबोरे, पिट्स्बर्ग, पेन्सिल्वेनिया |
| | सुनील सूर्यवंशी, डॅनबरी, कनेटीकट |
| | वसुधा पटवर्धन, बे एरिया, कॅलिफोर्निया |
| | कमलेश अंधारे, हॅरीसबर्ग, पेन्सिल्वेनिया |

**मताधिकार नसलेले सभासद**

| | |
|---|---|
| **माजी अध्यक्ष:** | माधुरी जोशी, मॉन्टव्हिल, न्यू जर्सी |
| **वृत्त संपादक:** | संजय गोखले, न्यू यॉर्क |
| **मैत्र अध्यक्ष:** | विजय पराडकर, रेस्टन, व्हर्जिनिया |

**सल्लागार समिती**

| | |
|---|---|
| **अध्यक्ष:** | श्री ठाणेदार, मायामी, फ्लॉरिडा |
| **सदस्य:** | आनंद जोशी, एडिसन, न्यू जर्सी |
| | मोरेश्वर पुरंदरे, बे एरिया, कॅलिफोर्निया |



| | |
|---|---|
| **प्रकाशक:** | बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका<br>109 Hockessin Drive, Hockessin, DE 19707 |
| **संकेतस्थळ:** | www.bmmonline.org |



Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from BMM. BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.


# श्रद्धांजली

## डॉ. लक्ष्मण (बंडू) फडके



डॉक्टर लक्ष्मण उर्फ बंडू फडके यांचे राहत्या घरी वयाच्या ६६ व्या वर्षी हृदयविकाराने दि. ७ नोव्हेंबर रोजी दुःखद निधन झाले. मृदुभाषी, बोलका स्वभाव, परोपकारी वृत्ती, मदतीस तत्पर, असे शांत व सौम्य व्यक्तिमत्त्व होते. वडील अण्णा दशग्रंथी ब्राह्मण, मुंबईच्या Saint Columbia High School मध्ये शिक्षक. संगीताचे वर्ग चालवत. बंडू मदत करीत असत, त्यातूनच संवादिनी वाजवण्याचा छंद लागला. मुबईतील Royal Institute of Science मधून M.Sc. झाल्यावर १९६८ साली अमेरिकेत आगमन झाले. १९७५ मध्ये University of Miami मधून डॉक्टरेट. North Eastern University मध्ये प्राध्यापक. १९८७ मध्ये न्यूजर्सीला स्थलांतर. Mercer County कॉलेजमध्ये अध्यापन.

बालपणी धार्मिक संस्कारामुळे अधात्म्याकडे कल. धार्मिक ग्रंथांचे वाचन, मनन, चिंतन, संग्रह व अध्ययनाचा ध्यास. न्यूजर्सीच्या अध्यात्मिक सामूहिक वाचन मंडळाचे संस्थापक सदस्य व तहहयात सहभाग. विविध ग्रंथांचे वाचन. भगवद्गीता जवळ जवळ मुखोद्गत. योग्यवेळी संदर्भ व सोप्या भाषेत निरुपण. अधून मधून लेखन. DNA व जनुकावर संस्कृत ग्रंथावर आधारित माहितीपूर्ण व चिकित्सक लेख लोकांना भावला होता. शास्त्रीय संगीताच्या मैफलीला हजेरी, वेळ पडल्यास साथ देण्याची तयारी.

जनमानसात बंडू फडके म्हणजे फडके गुरुजी. पूजाअर्चा, जपजाप्य, धार्मिक सण, उत्सव, सत्यनारायण, गणेश पूजन, वास्तुशांत, प्रासंगिक धार्मिक विधी आपल्या संथ वाणीत शांतपणे कथन करीत असत. डॉक्टर घाणेकर यांच्या गणेश उत्सवात अथर्वशीर्ष सहस्र पारायणाचे सूत्रधार व संचालक. थोडक्यात युवा पिढीवर संस्कार करण्याचे महान कार्य केले. मराठी मनात फडके गुरुजींची स्मृती कायम राहील. रत्नागिरीजवळील आडी या आपल्या मूळ गावात ग्रामसुधार व्हावा म्हणून ते सतत प्रयत्नशील असत. उच्चविद्याविभूषित प्राध्यापक डॉक्टर लक्ष्मण फडके, जनमानसातले फडके गुरुजी या सात्विक सौजन्यमूर्तीस भावपूर्ण आदरांजली. डॉक्टर फडक्यांच्या पश्चात पत्नी आसावरी, सुपुत्र योगेश, सुकन्या ज्योती आहेत.


**रमेशचंद्र प्रधान, न्यू जर्सी**
pradhandada@yahoo.com

# बीनटाऊनच्या बातम्या

**“ FREE TICKET TO 2013 BMM Convetion in BOSTON ”**

**Slogan & Logo Competition**

## २०१३ बॉस्टन अधिवेशनाचे घोषवाक्य आणि प्रतिकचिन्हाची स्पर्धा

२०१३च्या बॉस्टन येथे होणाऱ्या BMM अधिवेशनाच्या संयोजक समितीने घोषवाक्य आणि प्रतिकचिन्हाची स्पर्धा आयोजित केलेली आहे. विजेत्या स्पर्धकाला २०१३ च्या अधिवेशनात विनामूल्य प्रवेश दिला जाईल. तसेच अधिवेशन स्मरणिकेत विजेत्या स्पर्धकाचे छायाचित्र प्रकाशित केले जाईल. ही स्पर्धा उत्तर अमेरिकेतल्या सर्व मराठी/ अमराठी व्यक्तींसाठी खुली आहे. ह्या स्पर्धेत भाग घेण्यास उत्सुक आणि इच्छुक असलेल्यांनी आपले घोषवाक्य आणि/ अथवा प्रतिकचिन्ह, ३१ डिसेंबर २०११ पर्यंत श्रीनिवास साने यांना shriniwas.sane@bmm2013boston.com या इमेलवर पाठवावे. फेब्रुवारी २९, २०१२ ला विजेत्या स्पर्धकाचे नाव जाहीर केले जाईल.

या दोन पूर्णपणे वेगवेगळ्या स्पर्धा आहेत. एका व्यक्तीला दोन्हीतही भाग घेता येईल.

या स्पर्धेचे नियम असे आहेत:

१. सुचविलेले घोषवाक्य/ प्रतिकचिन्ह connections\नाते\ऋणानुबंध या विषयाशी संबंधित असावे.
२. विजेत्या घोषवाक्यास व प्रतिकचिन्हास प्रत्येकी एक BMM २०१३ च्या अधिवेशनाचे तिकीट विनामूल्य दिले जाईल.
३. एकाच प्रकारच्या, एक सारख्या २ अथवा अधिक आलेल्या प्रवेशिकांचा "lottery" स्वरूपाने निर्णय होईल.
४. अंतिम निर्णय BMM २०१३ अधिवेशनाची कार्यकारी समिती घेईल.
५. सादर केलेली प्रवेशिका ही पूर्णपणे स्वतःची असावी व कुठल्याही व्यक्तिगत अथवा उद्योगाच्या प्रताधिकाराचे उल्लंघन केलेले नसावे.
६. एका स्पर्धकाला, एका स्पर्धेसाठी जास्तीत जास्त ३ प्रवेशिका पाठवता येतील.
७. एकदा प्रवेशिका पाठवल्यावर, निकाल जाहीर होईपर्यंत स्पर्धकाने आपली प्रवेशिका कुठल्याही माध्यमात प्रसिद्ध करू नये.
८. विजेत्या घोषवाक्याचे आणि प्रतिकचिन्हाचे सर्व मालकीहक्क BMM २०१३ अधिवेशनाच्या कार्यकारी समितीकडे राहतील.

काही कारणास्तव या तारखेत बदल झाल्यास **website** वर नमूद केले जाईल.

**http://bmm2013boston.com/sloganlogo** इथे अधिक माहिती मिळवू शकता.

# गणपती... एक असाही!

तेव्हा आम्ही इचलकरंजीमध्ये दि डेक्कन को-ऑप स्पिनिंग मिल इथे रहात होतो. बाबा तेव्हा दि डेक्कन स्पिनिंग मिल मध्ये नोकरीला होते. डेक्कन मिलचा उल्लेख तेव्हा इचलकरंजीमध्ये 'डेक्कन' असाच व्हायचा. म्हणजे, "तू कुठे राहतेस?" असं विचारलं की, "डेक्कनला" इतकंच उत्तर पुरे व्हायचं. डेक्कन हा सीटीबसचा स्टॉप होता. तमाम टांगेवाल्यांसाठी घोडातळ (वाहनतळ तसं घोडा तळ) होता. म्हणजे डेक्कनला लोक घेऊन आलेला टांगेवाला तिथे घोडा सोडून, त्याला चारापाणी वगैरे करायचा. तर असं हे डेक्कन. तेव्हा माझे तीन मामा इचलकरंजीतच रहात होते. काकाही गावभागात रहायचा. पण ही चुलत, मामे भावंडं "उद्या डेक्कन ला येतो आम्ही" असं म्हणायची. आत्याकडे किंवा काकाकडे असं म्हणायची नाहीत. हे सगळं सांगायचं कारण इतकंच की तेव्हा डेक्कन हे प्रस्थ फार फार मोठं होतं. आशिया खंडातली ती तेव्हाची सगळ्यात टॉपला असलेली को-ऑप सेक्टर मधली मिल होती. आईचे वडील म्हणजे माझे आजोबा हे त्या मिल चे फाऊंडर मेंबर आणि पहिले चेअरमन. योगायोगाने माझे बाबाही टेक्स्टाईल मध्येच आले आणि लग्नानंतर आई पुन्हा डेक्कनलाच आली. माझा जन्मही तिथलाच. इतक्या सगळ्या प्रकारे ते डेक्कन मनाच्या कोपऱ्यात अखंड पिंगा घालत असतं. ती मिल बंद पडली, कामगारांची वाताहात झाली हा नंतरचा इतिहास!! पण माझ्या आयुष्यातले फुलपाखरी दिवस या डेक्कनच्या सान्निध्यात गेले. थोडीथोडकी नव्हे माझ्या वयाच्या १५ वर्षापर्यन्त मी डेक्कन मध्ये होते. प्रशस्त क्वार्टर्स, आजूबाजूला मोठी बाग, आंबा, पेरू, जांभूळ, चिंच, पपई, सीताफळ, रामफळ, चिकू... अशी सगळी झाडं त्या बागेमध्ये. लाल चुटूक मिरचीच्या फुलापासून, मोगरा, जाई-जुई, देशी गुलाब, निशिगंध, कण्हेरी, कर्दळी अशी सगळी फुलझाडं. बागकाम करायला, बाथरूम्स धुवायला नेमलेली माणसे, असा सगळा जामा निमा होता. आम्हाला खेळायला प्रचंड मोठी लॉन्स होती. पंचगंगेपासून डेक्कनने स्वत:ची पाण्याची पाईप लाईन घेतलेली असल्यामुळे संपूर्ण गावात पाण्याची बोंब असली तरी डेक्कन मध्ये पाण्याचं दुर्भिक्ष कधीच जाणवलं नाही. उंचच उंच डोलणारी नारळाची झाडं ही डेक्कन जवळ आल्याची खूण. गेटवर कायमच ४-५ वॉचमेन. त्यामुळे डेक्कनला रहात असणे ही अतिशय अभिमानाची बाब होती. डेक्कन होतीच तशी!!

अशा या डेक्कनचा गणपतीही तिच्या लौकिकाला साजेसा!! मूर्ती काही फार मोठी नसायची पण देखावे इतके अप्रतिम की, डेक्कन तेव्हा गावाच्या बरीच बाहेर असूनही लोक रिक्षा-टांगे करून देखावे पहायला यायचे गावभागातून. संभाजी औरंगझेब... तो डोळे काढलेला सीन, एकदा मत्स्यकन्या आणि राक्षस, हनुमानाचा मेरू पर्वत उचलून आणलेला सीन, द्रौपदी वस्त्रहरण... अशा सारखे देखावे होत असत. आणि गणपतीमध्ये १० दिवस कार्यक्रमही इतके क्लास... मोरूची मावशी, शांतेचं कार्ट चालू आहे, टूर-टूर अशी भन्नाट नाटके, पंडीत भीमसेन जोशींचे गाणे... अशी सगळी दिग्गज मंडळी या डेक्कनच्या गणपतीत कार्यक्रम सादर करायला येत असत. हे कार्यक्रम डेक्कनच्या सगळ्याच नोकरदार वर्गाला आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी मोफ़त असत. तर या 'डेक्कनच्या गणपती'चे विसर्जनही इतके थाटामाटात व्हायचे की ज्याचं नाव ते!! डेक्कनचे स्वत:चे ट्रक्स होते दोन. त्यातला एका ट्रकच्या टपावर गणराज विराजमान होत आणि सगळा ऑफिसर वर्ग आणि कामगार वर्ग, कोणतेही स्पिकर्स वगैरे न लावता, फक्त ढोल ताशाच्या ठेक्यावर झांझ आणि लेझिमच्या सोबतीने नाचायचा! बघणारे बघतच रहायचे!

असो... नमनाला धड्यापेक्षा जास्तीच तेल झालं हे!! पण हे सांगणं गरजेचं होतं.

माझे आजी-आजोबा (बाबांचे आई-वडील) तासगांवला असत. तिथे आम्ही दीड दिवसाच्या गणपतीला जात असू आणि ऋषी पंचमीला तासगांवचा रथोत्सव करुन डेक्कनला परतत असू. आणि मग पुढे आठ दिवस डेक्कनच्याच गणपतीची धूम! इतरवेळी अधून मधून बाबा मोटरसायकल वरूनच तासगांवला सकाळी जाऊन संध्याकाळी परतत असत. असेच एकदा कधीतरी गणपतीच्या आधी बाबा तासगांवहून परतले. तुफ्फान पाऊस होता. त्यामुळे बाबांसाठी लगबगीने दार उघडायला गेलेली आई मागच्या दारात साठलेल्या पाण्यावरुन पाय घसरून पडली आणि पाय फ्रॅक्चर झाला. २१ दिवसांचे प्लास्टर बसले पायाला. गणपती तोंडावर आलेला. झालं!! आता आईला तासगांवला जाणे जमणार नव्हते. त्यामुळे मी, बाबा आणि भाऊ गणपतीसाठी २ दिवस तासगांवला जायला निघालो. शांताबाई म्हणून आमच्याकडे येणारी कामवाली आईजवळ थांबली. आई साठी बाबांनी दोन बांबूच्या काठ्या खालच्या बाजूला रबरी बूचे मारून आणून दिल्या होत्या. त्यामुळे त्या हातात घेऊन टेकत टेकत आई थोडं थोडं चालू शकत होती. पण तरीही.. तिला तसे तिथे सोडून फक्त २ दिवसासाठी सुद्धा तासगांवला जायला माझं मन तयार होत नव्हतं. तासगांवला न्यायसाठी आईने बरंच सामान सुमान, आमचे कपडे असे एका बॅगेत भरून दिले होते. निघायच्या आधी मी कशासाठी तरी स्वयंपाक घरात आले तर आई देवापुढे उभी होती आणि हात जोडून रडत होती. "या वर्षी काय माझ्या हातून सेवा नको आहे का रे तुला?" असं विचारलं तिने. वयाच्या ७ व्या वर्षीही तिला तसं पाहून मला गलबलून आलं. पण मी बाहेर आले पट्कन. आणि आम्ही जाताना पुन्हा तिचे डोळे भरून आले. दोन दिवसांनी आम्ही परत डेक्कनला आलो. पुन्हा डेक्कनच्या गणपतीच्या धामधूमीत मश्गुल झालो. तशाही स्थितीत आईने दरवर्षी प्रमाणे उकडीच्या मोदकांचा नैवेद्य डेक्कनच्या गणपतीसाठी केला होता. यावेळी रात्री जेवणे आटोपून नाटके पहायला मी बाबा-भाऊच गेलो फक्त. सकाळ-संध्याकाळच्या आरतीलाही, यावेळी आई नव्हती. खूप काहीतरी खोल रूतत होतं. आई सोबत नाही म्हणून असेल किंवा माझं वय असेल... किंवा दोन्ही असेल! कारण डेक्कन मध्ये तशी चोऱ्यामाऱ्याची भिती नव्हती, रहदारीची भिती नव्हती. त्यामुळे मी एकटी डेक्कन मध्ये कुठे फिरत नव्हते असं नव्हे. पण गणपती होता आणि जे चाललं होतं सगळं ते आईशिवाय चाललं होतं! कोणाशी

बोलावं समजत नव्हतं. आईशी बोलू शकत नव्हते, मी किती गम्मत जम्मत करतेय तिच्याशिवाय हे ऐकलं तर तिला वाईट वाटेल म्हणून सांगतही नव्हते. बाबांशी बोलले तर बाबांनी जवळच घेतलं त्यामुळे पुन्हा काय तेच बोलणार असंही वाटलं त्यामुळे घुसमट मात्र होत होती. आणि... तो गणपती जाण्याची वेळ झाली. अनंत चतुर्दशीला!!

सकाळ पासून अख्खं डेक्कन मिरवणुकीच्या तयारीला लागलं होतं. सगळे बागकाम करणारे माळी–लोक फुलांच्या माळांनी दोन्ही ट्रक सजवत होते. ढोल–ताशे, झांझ पथकं, तयारीत उभी होती. लेझिम चे ढीगच्या ढीग गणपतीच्या आवारात येऊन पडले होते. मांडवात १०००च्या घरात कामगार लोकं जमली होती. सगळे साहेब लोक वेगवेगळ्या सूचना करत होते. गुलालाची पोती येऊन पडली होती. पताकांनी ट्रक सजले होते. गणेशमूर्ति घेऊन बसणारे जास्तच ताठ मानेने फिरत होते. सुंठवडा, खोबऱ्याची बर्फी, पेढे, चुरमुरे यांचा एकत्रित वास दरवळत होता. जिथून ट्रक निघणार त्याच्या बाजूलाच डेक्कनचे भले मोठ्ठे गेस्ट हाऊस होते. तिथल्या बाल्कनीत सगळ्या साहेब लोकांच्या बायका येऊन थांबल्या होत्या. आम्ही मुले, चुरमुरे, फुटाणे, बर्फी तोंडात टाकत शेवटच्या आरतीची वाट पहात होतो. आरती चालू झाली आणि मंत्रपुष्प झाल्यावर मूर्ती हलवली. आणि मग ५–६ कामगारांनी मिळून ती ट्रकच्या टपावर, जिथे गणराजांसाठी आसन केलं होतं तिथे, 'गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या...' च्या गजरात सावकाश ठेवली. पुन्हा एकदा गणपती बाप्पाचा गजर झाला आणि ढोल ताशे घुमू लागले, झांझ आणि लेझिम च्या तालावर पाय थिरकू लागले, वेगवेळ्या ठेक्यांच्या त्यांच्या कवायती झाल्या, गुलाल उधळला जात होता. बाबा त्यांच्या मित्रांसोबत आपला पदाचा आब राखत, हलके हलके ठेक्यावर नाचत होते. आम्ही मुले ट्रकच्या मागच्या हौद्यात जमेल तसे नाचत होतो. सगळी धामधूम चालू होती. नदीवर बाप्पाला सोडायला जायचं होतं. ते ही हा डेक्कनचा बाप्पा होता. ट्रक हलला, अगदी संथ गतीने सरकू लागला. पुढे झांझ पथक, लेझिम खेळणारे, नाचणारे, मागे बाप्पाचा ट्रक आणि त्यामागे जे चालू शकत नव्हते, थोडे वयाने मोठ्ठे होते अशा लोकांना घेऊन जाणारा दुसरा ट्रक. अशी ही शानदार मिरवणूक डेक्कन च्या गेटमधून बाहेर पडायलाच अर्धा तास लागला. बेहोष असा माहोल होता! वेड्यासारखं स्वत:ला झोकून देऊन नाचत होती सगळी मंडळी आणि आम्ही मुले सुद्धा. मात्र... गेट मधून ट्रक बाहेर पडताना मला आई दिसली. त्या गेस्टहाऊसच्या भल्या मोठ्या बाल्कनीत, पाठमोऱ्या झालेल्या या गणराजाला विसर्जनापूर्वी शेवटचा नमस्कार करताना, हातातल्या काठ्या सांभाळत, अवघडून उभी राहिलेली आणि तशाही परिस्थितित दोन्ही हात जोडून पाठमोऱ्या गणेशाला मनोभावे नमस्कार करणारी आई... मला तेव्हा खूपच केविलवाणी, असाह्य वाटली. नाचणारे माझे पाय थांबले. वाटलं ती आताही असंच म्हणाली असेल का... "बाप्पा, माझ्याकडून सेवा करुन घ्यायची नव्हती बहुतेक यावर्षी तुला!!" राहून राहून मला आई आठवायला लागली. ती अशी असताना मी बाप्पाच्या मिरवणूकीत नाचू?? मन खायला लागलं. ढोल–ताश्यांचे आवाज मला ऐकू यायचे बंद झाले. लेझिमवर थिरकणारे पाय मला दिसेना झाले. आणि परतवायचा लाख प्रयत्न करूनही अश्रू पापण्याबाहेर पडलेच. आणि मग कोण्या एका काकाने मला ट्रक मधून खाली उतरवले. आणि मी त्या गर्दीतून वाट काढत बाबांच्या कानाशी जाऊन, "मी घरी जातेय" असं सांगून गेस्ट हाऊसकडे धूम ठोकली. तोपर्यन्त सगळ्या बायका गेस्टहाऊस बाहेर पडल्या होत्या. आई सुद्धा काठ्या टेकत टेकत घरापर्यन्त पोहोचली होती. पट्कन जाऊन तिला बिलगले. आई म्हणाली, "काय गं, जाणार नाहीस का मिरवणुकीत?" तसंच तिला बिलगलेल्या अवस्थेत सांगितलं, "अंहं!! मला नाही जायचं. कंटाळा येतो मला." आता मात्र मी अश्रू परतवण्यात यशस्वी झाले होते.

हा प्रसंग आहे साधासाच पण आजही लख्ख आठवतो मला, नुकत्यात घडल्यासारखा. मनावर कोरला गेला असावा. या डेक्कनच्या आठवणी खूप आहेत. आता कधी इचलरंजीला जाणं झालं मामांच्याकडे, तर डेक्कनवरून जाताना नारळाच्या झाडांचे नुसतेच उरलेले बुरखुंदे काळजाला घरं पाडतात. एकेकाळी प्रचंड ऐश्वर्य पाहिलेली ही मिल आता नामशेष झाली आहे!

**प्राजक्ता पटवर्धन**

*****

## ९ वे युरोपीय मराठी संमेलन

नववे युरोपीय मराठी संमेलन इंग्लंडमधील कार्डिफ या गावी ६ ते ८ एप्रिल या दिवशी साजरे होईल. अधिक माहिती खालील लिंकवर पहा.

http://www.myvishwa.com/EMS2012/index.aspx

## चित्तपावन फाऊंडेशनतर्फे जागतिक संमेलन आणि उद्योजकांचे प्रदर्शन

चित्तपावन फाऊंडेशनतर्फे जागतिक संमेलन आणि उद्योजकांचे प्रदर्शन २१ ते २५ डिसेंबर रोजी पुण्यात चंद्रशेखर आगाशे महाविद्यालयाच्या मैदानावर (मुकुंदनगर) भरेल. अधिक माहितीसाठी खालील लिंक पहा.

http://chitpavanfoundation.org/Chitpavans/files/CF_Tread_Fair_MAIN_DOCKET.pdf

## ई साहित्य

http://www.bmmonline.org/vrutta-esahitya

ह्या संकेतस्थळावर खालील साहित्य उपलब्ध आहे.

- नोव्हेंबर महिन्याचे राशिभविष्य – दादा दामले

# ड्रॅगनच्या देशात



Great Wall of China

सप्टेंबरमध्ये नुकत्याच केलेल्या चीनच्या सहलीत तेथील एकूण परिस्थितीचा आढावा घेण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. हे प्रवासवर्णन नसून लेखकाने केलेल्या निरीक्षणाचा हा मागोवा आहे. चीनी शासनाच्या संमतीने पर्यटकांना काही निवडक भागच दाखवला जातो त्यामुळे, हे निरीक्षण त्या देशाचे संपूर्णत: प्रातिनिधिक नाही. गेल्या दोन दशकात ह्या देशाने एव्हढी प्रगती केली की जगातील बहुतांशी देशांत त्याने आपले पाय रोवले आहेत आणि जगाला एक धक्का दिला आहे.

हॉटेलमध्ये सर्वत्र व्हिडीओ कॅमेरे व स्क्रीन्स बसवलेले होते. हॉटेलमध्ये पासपोर्ट जमा करून त्याची झेरॉक्स कॉपी काढण्याची तसेच सर्वांचे प्रत्येक पर्यटनस्थळी आगमनानंतर आणि जातांना फोटो काढून ठेवण्याची पद्धत आहे. ह्याचे कारण म्हणजे एखादा पर्यटक मधेच कोठे भूमिगत झाला नाही याची खातरजमा करून घेण्यासाठी. सर्व देशच एकूण अतिसंवेदनशील आणि कोणावरही विश्वास न ठेवणारा असावा. सर्व ठिकाणी सेवकवर्ग विनम्र, विनयशील परंतु करडी नजर ठेवून राहणारा आढळून आला. संशयास्पद हालचाली समजा त्यांच्या नजरेस आल्याच तर “May I help you?” अशी नम्र विचारणा.

हॉटेल्स जरी अद्ययावत, अलिशान आणि सर्व सुखसोयींनी युक्त असली तरी इंटरनेटची सोय असून नसल्या सारखीच. बहुसंख्य लोक हूण वंशाचे असून ते प्रामुख्याने Cantonese भाषा बोलतात. भारतासारखेच तेथेही राज्यवार भाषांचे कडबोळे आहे. चीनमधे ८० टक्के लोक बुद्धधर्मीय आहेत. शहरातील लोक शिस्तप्रिय आढळले. चीनी Restaurants मधून जेवणाच्या पदार्थांबरोबर कोरा चहा देण्याची सर्रास पद्धत आहे. आम्ही भेट दिलेल्या शहरांत पंजाबी, उत्तर भारतीय Restaurants पाहण्यात आली. पाकिस्तानीही “कहांके है” विचारल्यावर सरळ “इंडियाके है” म्हणून ठोकून देतात.

या देशाने विसाव्या शतकाच्या अखेरीस, जेव्हां अमेरिकेस आर्थिक संकटाचे ग्रहण लागले, त्याच सुमारास Economic Reforms अवलंबित करून गेल्या वीस वर्षात सर्व क्षेत्रात संपूर्ण जगात आपले पाय रोवून आर्थिकदृष्ट्या बलाढ्य देश म्हणून स्थान मिळवले आहे. साम्यवाद असूनही संप, मोर्चा, निषेध, मिरवणूक या सर्वांना बंदी आहे. विरोधी आवाज म्हणजे तत्काळ गठडी आणि तुरुंग कोठडी. आम जनता व कैदी यांना वेठीस धरून अपार कष्ट करून घेतले जात आहेत. श्रीमंत आणि गरीब यांची दरी, भारताप्रमाणेच वाढत आहे. तरीही या देशाने साम्यवादात भांडवलशाहीचे आरोपण करून शिस्त, धाक आणि राष्ट्रीय एकात्मता यांच्या जोरावर राष्ट्राचा प्रचंड कायापालट केला आहे. उदाहरण द्यायचे झालेच तर मूलभूत सुविधा, शहरीकरण, प्रदूषणरहित उद्योगीकरण, आधुनिक कृषी उद्योग, जल-विद्युत प्रकल्प, उर्जा, आयात-निर्यात व्यापारास अग्रक्रम इत्यादी क्षेत्रात चीनने अमेरिकेला मागे टाकले आहे. १९९० पासून लोकसंख्येवर नियंत्रण आणण्यासाठी “एक दाम्पत्य-एक अपत्य” अशी एकसूत्री योजना राबविण्यात येत आहे. याचे उल्लंघन केल्यास जबरदस्त भुर्दंड पडतो. शहरीकरणामध्ये देखील आधुनिक विमानतळ, गगनचुंबी इमारती, shopping complexes इत्यादी पाश्चिमात्य देशांपेक्षाही अद्ययावत दृष्टोत्पत्तीस आले. रस्त्यांची सफाई रोज सकाळ-संध्याकाळ नियमित केली जाते. मुख्य म्हणजे भारतात जागोजागी दिसणारे कचऱ्याचे ढीग, आणि भिकारी दिसत नाहीत. दळणवळण आणि वाहतूक व्यवस्थापनावर शासनाने गेली दहा वर्षे लक्ष केंद्रित करून National Trunk Highway System द्वारे देशभर ७४००० कि. मी. दृतमार्गाचे जाळे केले आहे, २००,००० किंवा अधिक लोकवस्तीची शहरे व राज्यांची प्रत्येक राजधानी बेजिंग शहरास जोडली आहे. रस्त्यांची एकूण बांधणी आणि व्यवस्थापन अमेरिकेच्या खालोखाल वाटले. रेल्वेचे जाळेही तसेच ९१००० कि.मी. लांब पसरले आहे. मोक्याच्या ठिकाणी रेल्वेची सोय असून विमानतळ, औद्योगिक शहरे, बंदरे अशा मुख्य ठिकाणी Rapid रेल्वे किंवा China High Speed Trains बऱ्याच मार्गावर आहेत. गाडीतील सुविधाही उत्तम दर्जाच्या होत्या. शहराबाहेरील रस्त्यांच्या दुतर्फा ५०० meter अंतरावर लोकवस्ती दिसली आणि दोन्ही बाजूला हिरवीगार शेती पसरलेली पाहून लहानपणची बालकवींची श्रावणमासी... कविता आठवली, मनाला प्रसन्न वाटले. ही शेते प्रामुख्याने भात आणि मक्याची होती. संपूर्ण प्रवासात सात आठ चीनी शेतकरी वेताची त्रिकोणी टोकदार टोपी घालून शेताच्या चिखलात काम करतांना आढळले. शेताच्या जवळच मका सोलण्याच्या गिरण्या दिसल्या. संपूर्ण जमीन शासनाच्या मालकीची असून शेतकऱ्यांना पैसे देऊन छोटा तुकडा शेतीकरता विकत दिला जातो. ग्रामीण भागांसाठीही शहरीकरणाचे प्रयत्न जारी आहेत. गरीब आणि ग्रामीण विद्यार्थ्यांना सवलतीच्या दराने उच्च शिक्षण उपलब्ध आहे, परंतु वाढत्या खर्चामुळे बरेच विद्यार्थी शिक्षण अर्धवट टाकून शहरात नोकरी धरतात. ‘यांगत्से’ ही जगातील एक मोठी व लांब नदी आहे. नदीतून मोठ्या बोटींची ये-जा चालू असते. नदीवर लांबच्या लांब पूल असून सर्वात लांबीचा पूल Qingduo ते Hainan हा २६ मैल लांब आहे यांगत्से नदीला दरवर्षी येणाऱ्या महापुराने नदीकाठची

असंख्य गांवे उध्वस्त होत असत. हा धोका टाळण्यासाठी 'डॉ. सून यात सेन' ह्यांच्या प्रयत्नाने सर्व वाद मिटवून Three Gorges Dam हे धरण २००९ साली पूर्ण झाले. ह्या धरणाने जरी गांवे, प्राचीन वास्तू जमीनदोस्त झाल्या, जंगलतोड झाली तरी या प्रचंड धरणामुळे महापुराचे अरिष्ट टाळून २०,३०० मेगाव्याट क्षमतेच्या विद्युत उर्जाचे उत्पादन होऊन बेजिंग, नानकिंग, व शांघाय शहरांना वीज पुरवठा होतो. धरणाला तिकीट लावून पर्यटकांकडून जोड उत्पन्नही मिळते. नदीतून Cruise ने ship elevator द्वारे वर येऊन या धरणाचा भाग दाखवला जातो.

चीनच्या तत्कालीन सम्राटांना बौद्ध धर्माची मोहिनी पडली आणि त्यांनी त्याला आश्रय दिला. प्राचीन कालच्या भारतातील धर्मरक्ष, कश्यप, मातंग, साक्ख्य इत्यादी ऋषी–मुनींचा तत्कालीन सम्राटांनी यथोचित सन्मान केला. बुद्ध ग्रंथ 'महायान' याचे चीनी भाषेत भाषांतर केले. निसर्ग रम्य परिसरात बुद्ध मंदिरे उभारली. कालांतराने यांची नासधूस झाली, परंतु मंदिरातील मूर्ती अजून टिकून आहेत. वास्तूंची डागडुजी करून आता त्या पर्यटनाचे स्थळ म्हणून दाखवल्या जातात. आजही मंदिरात उदबत्ती, धूप दाखवून पूजा केली जाते. बेजिंग येथील लामा मंदिरात सहस्त्रभुज महाकाळ, काळभैरव, अवलोकीवेश्वर आदींच्या मूर्ती आहेत. शाओलीन हे पहिले बुद्ध मंदिर भारतातील बुद्ध भद्राने बसवले आहे. मंदिराजवळच कश्यप, मातंग व धर्मवर्ण यांचे दफन केले आहे. मंदिराजवळ असलेल्या पाण्याच्या कुंडात नाणी अर्पण केली असता बुद्धदेव पावतो अशी श्रद्धा आहे. शांघाय येथील ताओ मंदिरात बुद्ध, शिव व सरस्वतीच्या मूर्तींचे दर्शन घेतांना भरभरून येते. भाविक नतमस्तक होऊन आपोआप त्यांचे हात श्रद्धेने जोडले जातात आणि त्यांच्या तोंडून नकळत शब्द उमटतात... बुद्धं शरणं गच्छामि... धम्मं शरणं गच्छामि.

आमचा प्रवास एकूण १५ दिवसात हाँगकाँग, शांघाय, बेजिंग या जगप्रसिद्ध शहरांपासून ते Xian, आणि Chongquing सारख्या कधी न ऐकलेल्या अशा आठ शहरांमधून झाला. त्या आठ शहरातील काही शहरे औद्योगिक, तर काही धार्मिक स्थळांची तर काही आधुनिक plan करून बांधलेली आढळली. Xian येथे सुझुकीचा कारखाना पाहिला. हे ३.२० लाख वस्तीचे अद्ययावत प्रदूषणरहित टूमदार शहर म्हणजे चीनचे भूषण आहे. बहुतांशी taxi सुझुकी आहेत. Zengzhou हे प्रशस्त आवाराचे, अप्रतिम नक्षीकाम असलेले मंदिर पाहिले.

शांघाय व हाँगकाँग ही चीनमधील दोन शहरे अत्याधुनिक व आंतरराष्ट्रीय बाजारपेठा म्हणून गणल्या जातात. तेथील बुद्धाची Jade मूर्ती अप्रतिम आणि विलोभनीय आहे. शांघाय मधील T.V. Pearl Tower सर्वाधिक उंच वास्तू टोरोंटोच्या C N Towerची आठवण करून देते. रात्रीच्यावेळी ह्या tower वरून संपूर्ण शांघाय शहर नंदनवन भासते. हाँगकाँग जवळील Macau हे छोटे बेट म्हणजे पर्यटकांचे खास आकर्षण आहे. तेथील संग्रहालयातील घोड्याच्या पुतळ्याची किंमत ६५० लाख डॉलर्स एव्हढी आहे. जागोजागी चहाची दुकाने आहेत. चहाचे प्रकार तर बघायलाच नको एव्हढे वेगवेगळे. येथील दुकानदार पर्यटकांना फसवण्यात एकदम पटाईत आहेत. त्यातील शासनचलित दुकानेही त्याला अपवाद नाहीत. आमच्या सहलीच्या गाईडने सावधानतेचा इशारा देऊनही काही जणांना त्याचा फटका बसला. या दुकानदारांची नवीन पर्यटकांना कल्पना यावी म्हणून येथे दोन उदाहरणे देत आहे. एक म्हणजे खरेदीदार पर्यटकांना पैसे परत देतांना खोट्या नोटा हाती देऊन हातोहात फसवतात. रिकाम्या खोक्यात वस्तू ठेवतांना ठेवली आहे असे भासवतात पण प्रत्यक्षात ती ठेवली जातच नाही किंवा लहान आकाराची, कमी प्रतीची कधी ठेवतात याचा पत्ता लागत नाही. तेव्हां सावधानतेने व्यवहार करावा.

गेल्या वीस वर्षांत चीनने अति बलाढ्य आर्थिक महासत्तेकडे वाटचाल केली आहे. या आर्थिक विकासातून एक नवश्रीमंत वर्ग उदयास आला आहे. पर्यायाने कामगार कष्टकरी वर्ग आणि ह्या नवश्रीमंत वर्गातील दरी वाढत आहे. ही दरी अशीच वाढत राहिल्यास "तीएनमेन" चौकात झालेल्या उद्रेकाची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. माओचा साम्यवाद बाजूला




**तीएनमेन चौकात रमेशचंद्र प्रधान**

राहून भांडवलशाहीचा हुकुमशहा झाला आहे. त्याची परदेशी चलनाची साठवणूकच मुळी 3.2 trillion डॉलर्स इतकी असल्यामुळे पैशाच्या जोरावर हा ड्रॅगन अमेरिकेला शह देता देता जगातील सर्व देशांना गिळंकृत करायला निघाला आहे. आफ्रिकेतील दुर्लक्षित देशांकडे याची नजर आता वळली आहेच. तेथे वर्चस्व स्थापायला ह्या ड्रॅगनला वेळ लागणार नाही. त्याची माजोरी आणि अरेरावी पण इतकी वाढली आहे की आशिया खंडात भारत हा आपला प्रतिस्पर्धी आहे याची सल बाळगून, शेजारी राष्ट्रांशी दोस्ती करून भारताला कधी मगरमिठीत घेईल सांगता येणार नाही. तेव्हां "वैऱ्याची रात्र आहे जागृत रहा" असे म्हणण्याची वेळ आली आहे.

**रमेशचंद्र प्रधान, न्यू जर्सी**

**अंकासाठी साहित्य पाठवण्याचा पत्ता:**
**Email** : newsletter@bmmonline.org

# जावे त्यांच्या गावा ...

## एल्डोराडो च्या शोधात



अमेरिकेतल्या ह्या राज्याचे नाव कॉलोराडो पडले ते इथल्या लाल दगडामुळे. फार पूर्वीपासून उते, अरापाहो हे अमेरिकन इंडियन ह्या प्रदेशात राहत होते. १६००–१७०० साली फ्रेंच व स्पॅनिश लोक ह्या भागात आले. १८७६ मध्ये कॉलोराडो हे राज्य म्हणून घोषित झाले म्हणून ह्याला 'शताब्दी राज्य' म्हणतात. १८५८ मध्ये क्रिप्पेल क्रीक व साउथ प्लाट नदीच्या खोऱ्यात सोने सापडले व डेनवर, ऑरोरीया, बोल्डर, कॉलोराडो स्प्रिंग्स येथे गोल्ड रश चालू झाली. १९०० साली क्रिप्पेल क्रीक ही जगातली आघाडीची श्रीमंत सोन्याची खाण होती. कॉलोराडो हे फक्त सोनेच नाही तर भरपूर खनिज संपत्ती असलेले राज्य आहे, म्हणूनच येथील गावांची नावे लेड्वील, सिल्वरटन, कॉपर माउनटन अशी आहेत. आजही पेट्रोलच्या अनेक विहिरी जागोजागी दिसतात. कॉलोराडोच्या विधान भवनाला सोन्याच्या पत्र्याचा कळस आहे. डेनवर वस्तुसंग्रहालयात १३ पौंडाचा सोन्याचा दगड पाहायला मिळतो. असा एल्डोराडोच्या, म्हणजे स्वप्नातल्या सुवर्णाच्या गावाच्या शोधातून हा प्रदेश भरभराटीस आला.

येथे उत्खननामध्ये खूप डायनासोर सापडतात. मोरीसनला डायनासोरच्या पंज्याचे ठसे आहेत तर डायनासोर मोन्युमेंटला त्यांचे खूप अवशेष सापडतात. त्यातल्या स्टॅगोसॉरसला कॉलोराडो राज्याचा अधिकृत फॉसिल म्हणून घोषित करण्यात आलं आहे. डेनवरच्या वस्तुसंग्रहालयात एक भला मोठ्ठा डायनासोरचा सापळाच आपले स्वागत करतो.

बफेलो बिल, तायतानिक ची, मॉली ब्राऊन ह्या ऐतिहासिक व्यक्ती इथल्याच. क्लिफ हँगर, व्हेकेशन, बुच कॅसिडी, मॅकनाज गोल्ड हे सिनेमेही इथल्याच विषयांवर आधारित आहेत.

ऑक्टोबर महिन्यात तुम्हालाही येथे एल्डोराडो सापडेल. अस्पेन झाडांच्या सोनेरी पानांचे. लांबवर मैलोन्मैल पसरलेले डोंगर, त्यांवरील सोनेरी अस्पेनची जंगले, वळणदार वाटा व कुरणे. "कुरणांवरती, झाडांखाली, उन सावली विणते जाळी, येतो वारा पहा भरारा गवत खुशीने डुले" ह्या कवितेचा खरा अनुभव कॉलोराडोत येतो. मला सर्वाधिक भावते ती मनमुरादपणे उधळलेली येथली निसर्ग संपत्ती. पन्नासहून अधिक १४,००० हजार फुटांपेक्षा जास्त उंच बर्फाच्छादित शिखरे असणाऱ्या रॉकी पर्वतरांगांच्या कुशीत डेनवर मध्ये राहताना, दर सुट्टीला डोंगरात बागडताना, वितळलेल्या बर्फाच्या पाण्याच्या धबधब्यांचे तुषार अंगावर झेलताना, गगनचुंबी पाईनच्या जंगलात एल्क हरणाची हाक ऐकताना, तंबूवरील लाखो तारे पाहताना, त्या निर्मात्याचे शतशः आभार मानल्याशिवाय राहवत नाही.

कॉलोराडोतील रॉकी माउंटन, सँड ड्यून, ब्लॉक कॅनयन ही अभयारण्ये प्रसिद्ध आहेत. रॉयल गॉर्ज सारखा जगातला सर्वात मोठा सस्पेंनशन ब्रिज व रील कोग रेल्वेही येथेच आहे. कॉलोराडो, अर्कान्सा ह्या नद्यांवर मनमुक्त रॅफ्टींगची सोय आहे. येथील ११,१५८ फुटावरील आयसेन हॉवर बोगदा पार करून अस्पेन, व्हेल, ब्रेकेंरीज, अशा अनेक प्रसिद्ध स्कीईंगच्या जागांनी सामान्यांना, जगन्मान्य खेळाडूना व राष्ट्रपतींनाही भुलविले आहे. कोरडी गार हवा, निळेशार आकाश व प्रत्येक वर्षात तीनशे दिवस असणाऱ्या लख्ख सूर्यप्रकाशाने मन सतत उल्हासित राहते.

सौर उर्जा निर्माण करणाऱ्या ग्रीन तंत्रज्ञानात अग्रेसर अशा अनेक संस्था येथे आहेत. NREL किंवा नॅशनल रिन्यूएबल एनर्जी लेबॉरेटरी ही इथेच आहे. अनेक मराठी व भारतीय लोक इथल्या विद्यापीठात, IBM, ATT, एकोस्टार, HP ह्या संपर्क व माहिती प्रसारण कंपन्यांमध्ये, बडवायझर, कुर व इतर खाद्यौत्पादन आणि ग्रेट वेस्ट ह्या आरोग्य विमा कंपनीमध्ये काम करतात. पूर्वी लहान असलेले आणि गायी, घोडे व काऊबॉय असलेले डेनवर आता एक मोठं अग्रेसर शहर झाले आहे. येथले अनोखे, विलोभनीय विमानतळ बघून ते लगेच तुमच्या लक्षात येईल.

१५ वर्षांपूर्वी डेनवर ह्या कधीही न ऐकलेल्या गावी आम्ही आलो व भुलून गेलो. आमच्या आईवडिलांबरोबर, मित्रमैत्रीणींबरोबर, मराठी मंडळातून अनेक सहली काढल्या व खूप भटकलो. आचार्य अत्रे म्हणतात, "जीवन एक आनंद यात्रा आहे." ह्याचा कॉलोराडोत खरा प्रत्यय येतो.

**डॉ. मनिषा भिडे**

*****

## आमचं कोमराठी मंडळ

कॉलोराडो – चहूबाजूंनी डोंगर... हिवाळ्यात बर्फाच्छादित तर उन्हाळ्यात हिरवेगार. आकाशात नेहमी सप्तरंगांची उधळण. वर्षातले ३६० दिवस स्वच्छ सूर्यप्रकाश. सकाळ येते ती सोनेरी किरणांचा साज लेवून अणि संध्याकाळ होते ती संध्येचे तांबूस रंग लेवून. कुठल्याही कलाकाराला स्फूर्ती देणारं असं इथलं नैसर्गिक सौंदर्य. इथला निसर्ग मनाला उल्हास देतो तर इथली माणसं जिव्हाळा देतात. परकेपणा इथे जाणवतच नाही. मदतीला सगळे तत्पर. मराठी मंडळीतही केवढा आपलेपणा. तसं पाहिलं तर महाराष्ट्र मंडळांच्या इतिहासात 'कोमराठी' अगदी लहान बाळ आहे.

जेमतेम ८ वर्ष वय. अर्थात, त्याआधी इथे प्रस्थापित मंडळ नसलं तरी इथली मराठी मंडळी एकत्र येऊन गणपती, दिवाळी हे कार्यक्रम साजरे करायचीच... पण ते अगदी घरगुती स्वरूपाचे.

२००३ साली श्री बाबासाहेब पुरंदरे यांचं डेनव्हरला येणं झालं. इथल्या मंदिरात त्यांचं भाषण झालं. त्या भाषणाला आलेल्या लोकांची संख्या पाहून जुन्या लोकांना आश्चर्यच वाटलं. नोकरीच्या निमित्ताने लोक डेनव्हरला येऊ लागले होते पण त्यात इतके मराठी लोक असतील याची कल्पना नव्हती. बाबासाहेबांचं भाषण ऐकून सारेच भारावून गेले आणि मराठी पाऊल पडले पुढे.

आपण आता एकत्र येऊन कार्यक्रम केले पाहिजेत अशी भावना मूळ धरू लागली. मराठी लोकांना एकत्र आणायला गणपती उत्सवासारखा सण नाही. स्मिता राजे, आरती काळे व अरुंधती टोपकर या 'तीन देवीयाँ' एकत्र आल्या आणि २००३ साली पहिला सार्वजनिक गणेशोत्सव डेनव्हरमध्ये मोठ्या उत्साहात साजरा झाला. पुढे २००५ साली एका बुजुर्ग व्यक्तीने "मराठी मंडळाची रीतसर स्थापना करा" हा दिलेला सल्ला श्री प्रकाश राजें यांना मनोमन पटला आणि त्यांनी रीतसर मंडळ स्थापन करण्याचा जणू विडाच उचलला. Bylaws शोधून काढले, CoMarathi कागदोपत्री अस्तित्वात आली, कॉलोराडो मराठी मंडळ प्रस्थापित झाले.

सौ. स्मिता राजे २००६ साली मंडळाच्या पहिल्या अध्यक्षा झाल्या. २००३ सालांपासून मराठी मंडळींना एकत्र आणून कार्यक्रम करण्याचा अनुभव त्यांना होताच. कॉलोराडोतल्या मराठी मंडळींवर मंडळाचं छत्र उभं करण्याची जबाबदारी आता त्यांना पार पाडायची होती. त्यासाठी सदस्य नोंदणी, वर्गणी गोळा करणे ही कामं सुरु झाली. याच सुमारास सौ माधुरी दिक्षित–नेने डेनव्हरला स्थायिक झाल्या. हिंदी चित्रपटसृष्टितली ही सौंदर्यसम्राज्ञी किती मराठमोळी आहे ते डेनव्हरवासियांनी पाहिलं, तिचं मराठी भाषेवरलं, मराठी मंडळावरलं प्रेम त्यांनी अनुभवलं. सुरवातीला दिवाळीच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ती आली पण त्यानंतर मात्रं गणेशोत्सवात ती श्रद्धेने आली. पाहता पाहता ७९ कुटुंबे मंडळाची सदस्यं झाली. कुणी म्हणेल ही माधुरीची कृपा पण खरं तर ही राजे यांचीच कृपा. त्यांनीच कोमराठीचा पाया मजबूत केला. त्यांच्याच अध्यक्षतेखाली www.comarathi.org ही वेबसाईट तयार झाली. सर्वश्री सुधीर गाडगीळ, राहूल देशपांडे, शांभवी वझे यांचे कार्यक्रम त्यांच्या अध्यक्षतेखाली सुरळीत पार पडले.

२००७ साली श्री सुधीर देशपांडे यांनी अध्यक्षपदाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. गायन आणि नाट्यकलेचे रसिक अशा देशपांड्यांनी आकर्षक कार्यक्रम सादर करून नवीन सदस्य तर मिळवलेच पण सोबत काही प्रायोजक, देणगीदारही मिळवले. २००७ साली स्मिता तळवलकर, सुधीर गाडगीळ, त्यागराज खाडिलकर, दीपक देशपांडे यानी सादर केलेल्या गजऱ्याचा गंध अजूनही मनात ताजा आहे. अविनाश धर्माधिकारी यांचं व्याख्यान वेगळी स्फूर्ति देऊन गेलं. Overnight camping ची मजा देशपांड्याच्याच कारकिर्दीत अनुभवली. रंगमंचावर 'कोमराठी' चं बॅनर पहिल्यांदा झळकलं. काला पहाड ही एकांकिका सादर झाली आणि आपल्या गावात किती गुणी कलाकार आहेत याची जाणीव सगळ्यांना पहिल्यांदाच झाली.

२००८ साली श्री मिलिंद गोखले अध्यक्ष झाले. गोखले दांपत्याचा व्यावसायिक दर्जाचे कार्यक्रम तयार करण्यात आणि प्रस्तुत करण्यात हातखंडा आहे. नाटक, अंताक्षरी, जोडी तुझी माझी वगैरे विविध स्पर्धांचं आयोजन केलं. दिवाळी, गणेशोत्सव या सोबत कोजागिरी, संक्रांत हेही कार्यक्रम सुरु केले. सदस्यत्व वाढल्याने Online RSVP ची सोय केली. सर्वश्री हृदयनाथ मंगेशकर, सलील कुलकर्णी, संदीप खरे, रामदास फुटाणे, अशा अनेक मान्यवरांचे कार्यक्रम याच कारकिर्दीत झाले.

२००९ आणि २०१० अशी सलग दोन वर्ष श्री केदार भिडे यांनी मंडळाची बागडोर सांभाळली. भिडे दांपत्याचा मराठी परंपरा व संस्कृतीकडे खूप ओढा असल्याने मंगळागौरीचे खेळ, भोंडल्याची गाणी अशा विविध माध्यमांतून मराठी संस्कृतीचे दर्शन त्यांनी घडवले. श्री. श्रीधर फडके, शौनक अभिषेकी इत्यादी मोठ्या कलाकारांना त्यांनी डेनव्हरला आणले. तसेच 'रागारंगिनी' असा स्थानिक कलाकारांचा जोरदार कार्यक्रम प्रस्तुत केला. डेनव्हर मध्ये इतके उत्तम कलाकार असतील अशी बऱ्याच लोकांना कल्पना नव्हती. तसेच श्री. शशांक सप्तर्षी यांची मराठी शाळा पण तेव्हाच सुरु झाली. याच वर्षी मंडळाने बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या एकांकिका स्पर्धेत भाग घेतला आणि तिसऱ्या क्रमांकाचं पारितोषिकही मिळवलं. सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कारही आमच्याच मंडळाच्या मधुरा गोखले यांना मिळाला. BMM/ePrasaran आयोजित स्वरांगण स्पर्धेतला मस्त कलंदर मानस जालिहालही आमच्या डेनव्हरचाच.

आता २०११ साली माझी पाळी. मी जे करेन त्याची बातमी पत्रंकात देईनच. जाता जाता आवर्जून सांगतो की मंडळाच्या अध्यक्षांना त्यांच्या कार्यकारिणीची साथ मिळाली, सगळ्यांचा मदतीचा हात मिळाला, मार्गदर्शन मिळालं म्हणूनच त्यांची कारकिर्द यशस्वी झाली. आणि त्याकरता आम्ही आजीमाजी अध्यक्ष कॉलोराडो मराठी मंडळातल्या सदस्यांचे मनापासून आभार मानतो.

**अभय काळे,**
अध्यक्ष, कॉलोराडो मराठी मंडळ


# कुंडली मार्गदर्शन

नवजात ते बाल्यावस्थेतील मुलामुलींच्या जीवनात आंतरिक गुणांचा विकास व दोषांचे उच्चाटन व्हावे यासाठी तसेच इतरेजनांच्या जीवनातील विविध समस्यांसाठी जन्मकुंडली मार्गदर्शन हवेच !
त्यासाठी संपर्क साधा

**दादा दामले**

dadadamle@hotmail.com
Residence Phone: 908-371-1002

# मनोरंजन, माहिती आणि संगीताचा खजिना:

## http://www.iMusti.com

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शिकागो येथील २०११ च्या अधिवेशनात iMusti चा stall मी जेव्हा प्रत्यक्ष बघितला तेव्हा मला या अमूल्य अशा खजिन्याचा शोध लागला. या खजिन्यात आहे सुमधुर संगीत, भरपूर मनोरंजन आणि उपयुक्त माहिती. जुनी लोकप्रिय गाणी, जी ऐकत आपण भारतात वाढलो, ती गाणी आपण आजही नेहमीच गुणगुणतो आणि आपल्या संग्रही सुद्धा ठेवतो. गेल्या दहा एक वर्षात वेगवेगळ्या माध्यमांच्या द्वारे आणि कार्यक्रमांच्या द्वारे नवीन गीतकार, संगीतकार, गायक गायिका उजेडात येत आहेत. त्यांची माहिती, त्यांची कला, त्यांचे सूर इंटरनेट द्वारा म्युझिक पोर्टल वरून आपण ऐकू शकतो. हे असेच एक पोर्टल आहे.

**मराठी विभाग**: तुम्हाला गाण्यांच्या सीडीज, चित्रपट, मराठी नाटकांच्या डीवीडीज आणि माहितीपूर्ण सीडीज या विभागात बघायला, ऐकायला मिळतील. गाण्यांच्या सीडीजचं iMusti वरील कलेक्शन बघून मी ही थक्क झाले. शास्त्रीय संगीत, उपशास्त्रीय संगीत, नाट्यगीते, भावगीते, भक्तिगीते, लावण्या, पोवाडे, लोकसंगीत, देशभक्तिगीते, गझल, कारीओके अशा वेगवेगळ्या मूडची गीते ऐकायला मिळतील.

खजिन्यातील काही अमूल्य रत्ने: 'मराठी वैभव' हा रेडीओ कार्यक्रम सादर करण्याच्या निमित्ताने आणि काव्य आणि संगीत यांची गोडी असल्यामुळेच सतत नवीन सुमधुर गाण्यांच्या शोधात मी असते. 'मराठी वैभव'च्या रसिकांना नवीन सुंदर गीते, गीतरचना कधी एकदा ऐकवतोय असं होऊन जातं. गाण्यामधली भावुकता, भावार्थ आणि त्या संगीतरचनांचा आस्वाद सर्वांना अनुभवायला मिळावा हाच एक उद्देश. तर अशा या नव्यानं सापडलेल्या खजिन्याला आपण स्वतः भेट देऊनच त्याचं मूल्य ठरवा.

या खजिन्यातील काही अमूल्य रत्नेच जर सांगायची झाली तर उदाहरणादाखल काही नावं सांगते. व. पु. काळे यांचे कथाकथन (पंत वैद्य, अनामिक), निवडक पु. ल., बटाट्याची चाळ, प्रभाकर जोग यांचे गाणारे व्हायोलीन, दत्त मंत्र, अथर्वशीर्ष, शिवस्तोत्र, सुप्रभातम अशा स्तोत्र आणि मंत्रांच्या सीडीज तुम्हाला दिसतील. माहितीपूर्ण सीडीज मध्ये वास्तुशास्त्र यावरील माहिती, गर्भसंस्कार मंत्रांचा गर्भावर होणारा परिणाम, संस्कार, गायत्री मंत्र इत्यादी सीडीज नमूद करता येतील. काही नवीन गीतांच्या अल्बम्सची नावं उदाहरणादाखल मुद्दाम नमूद करते. 'सोनसडे' या अल्बममधले शंकर महादेवन यांनी गायलेले "प्रभात पसरी प्रभा रवीची दार उषेचे हळू उघडे" हे गाणं जरूर ऐका. 'गंध हलके हलके' मधलं "तुझी आठवण येता निळा डोह फेसाळतो" हे गीत अमृता काळे यांनी अतिशय सुंदर गायलं आहे. मयूर देवल या गीतकाराचे 'साजणा' आणि 'मन मोर' हे माझे आवडते अल्बम आहेत. 'गझल दरबार' मध्ये राहुल देशपांडे यांनी म्हटलेल "रंग नभाचे" हे अप्रतिम गाणं खूप वेळ तुमच्या मनात ऐकू येत राहील असं मला वाटतं. या अल्बमचे संगीतकार आहेत आशिष मुजुमदार. पंडित संजीव अभ्यंकर यांनी गायलेल्या अभंगांच्या सीडीज, खरंच भक्ती रसात बुडलेल्या आहेत. नवोदित आघाडीची गायिका माधुरी करमरकर यांनी 'कोलाज' या अल्बममध्ये जाई जुईच्या वेलीवरती हे गाणं अतिशय सुंदर म्हटलं आहे. सुवर्णा माटेगावकर यांचा 'सावळ्या घना', तसेच 'गाणे गा रे गा' या अल्बममध्ये विभावरी आपटे, ऋषिकेश रानडे यांची गीते खासच आहेत. संदीप खरे, सलील कुलकर्णी, साधना सरगम, देवकी पंडित, राहुल देशपांडे, पंडित संजीव अभ्यंकर यांचे नवीन अल्बम्स या सारखी अमूल्य रत्ने तुम्हाला या साईटवर सापडतील.

बालगंधर्व: मराठी चित्रपटाची DVD: २०११ मध्ये मोठ्या दिमाखात प्रदर्शित झालेला नितीन चंद्रकांत देसाई यांचा बालगंधर्व हा मराठी चित्रपट सुबोध भावे यांच्या अप्रतिम भूमिकेसाठी आणि आनंद गंधर्व म्हणजेच आनंद भाटे यांच्या नाट्यपदांसाठी अतिशय गाजत आहे. कौशल इनामदार आणि आदित्य ओक यांनी नवीन वाद्ये, आधुनिक तंत्रज्ञान वापरून जुन्या सोन्याचं मूल्य अधिक वाढवलं आहे. मराठी रंगभूमीवर सुवर्णयुग निर्माण करणाऱ्या बालगंधर्वांचा जीवनपट भव्य दिव्य सेट्स, भरजरी पैठण्या, तत्कालीन वेशभूषा केशभूषा वापरून आपल्या डोळ्यांसमोर जसाच्या तसा उभा केला आहे.

लेणे संह्याद्रीचे: हे सहा अलबम्स म्हणजे iMusti.com वरील स्वाक्षरी कार्यक्रम (Signature प्रोग्राम). खास iMusti च्या विनंतीवरून iMusti साठी 'मराठी वैभव' हा रेडिओ वरील कार्यक्रम सादर करणाऱ्या स्नेहल वझे आणि ध्वनी तंत्रज्ञ प्रदीप वझे यांनी तयार केले आहेत. एका सूत्राला धरून निवडक, सुमधुर अशी नवी आणि जुनी मराठी गाणी एकत्रितपणे रसाळ निवेदनाबरोबर सर्व रसिकांसाठी निवडून हे सहा अल्बम्स तयार केले आहेत. '(१) पौर्णिमेच्या चांद रात्री: कोजागर्ती (२) आभूषणे तन मनाची (३) उजळून या तिमिरात या (४) नका विचारू देव कसा (५) तू हसत रहा (६) सूर झंकारले' अशा सूत्रांमध्ये बांधलेले हे सर्व अल्बम्स. आमची खात्री आहे रसिकांच्या पसंतीस ते नक्की उतरतील.

अधिकृत आणि दर्जेदार: iMusti.com या म्युझिक पोर्टलचं वैशिष्ट्य हेच की सर्व प्रकारचं संगीत, माहितीपूर्ण सीडीज, तसेच व्हीडीओज हे अधिकृत आहेत. हिंदी विभागात जरूर फेरफटका मारा. गुजराथी, मराठी, बंगाली, तमिळ, तेलगु आणि मल्याळी अशा विविध भाषांमधील गाणी या संकेतस्थळावर तुम्हाला मिळतील. सर्व कायदेशीर हक्क असलेल्या संगीताचीच या संकेतस्थळावर विक्री होते. तुम्ही या संकेतस्थळाचे सभासद होऊ शकता किंवा अल्बम्स विकत घेऊ शकता. दर्जेदार संगीत आणि विविधता यामुळेच हे संकेतस्थळ तुम्हाला नक्की आवडेल अस वाटतं. सतत नवीन प्रसारित होणारे अल्बम्स, नवीन चित्रपट यांची भर घातल्यामुळे सतत चांगल्या, नवीन आणि विविध प्रकारच्या संगीताची तुम्हाला ओळख होईल अशी आशा वाटते. तेव्हा या iMusti.com खजिन्यातील अनेक दालनं तुम्हीच उघडून पहा.

**स्नेहल वझे**




The book is available online in BMM Bazar for US $20.00 (payment via Paypal) at http://www.bmmonline.org/momskitchen

OR

Please call Samita Ranade at
215-354-1423
Email: brihanmm@gmail.com

## HEALTH INSURANCE

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

*** VISITORS**
*** H-1 B VISA HOLDERS**
*** PERMANENT RESIDENTS**
**( Some restrictions apply)**

**For more information:**
**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**
**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: (800)204-1939

E-mail: padmajabapat@yahoo.com
Website: visitors-insurance.com

## COMFORT TRAVEL

ARC **EDISON, NJ** IATA

**COMFORTTRVL@YAHOO.COM**
**Most Trusted name in the business for 15 years.**
**We proudly consolidated for :**

1. **Jet-air, Continental, Kuwait, Emirates etc.**
2. **Non Stop AI Flights to Mumbai special fares**
3. **SOTC, COX & Kings, Trafalgar Tours and Cruis-es**

**Please Call: SHAILA SHIRVALKAR**
**TEL: 732-767-3135**

**JTI**

Crude oil and gas production in the US, India, and Colombia, South America



Joshi Technologies International, Inc.
5801 E. 41st Street, Suite 603
Tulsa, Oklahoma 74135

918.665.6419 ◇ jti@joshitech.com

www.joshioilandgas.com

बृहन्महाराष्ट्र वृत्त
॥ मराठी तितुका मेळवावा ॥

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408

